## उलटतपास श्री. ए. एन. वाढई वकील साहेब गैरअर्जदारा तर्फे

१२. आता माझी वय ४३ वर्षे आहे. हे म्हणने खरे आहे की माझे वडीलानी ऐच्छिक सेवानिवृत्ती नंतर त्या आदेशा विरुध्द कुठल्याही न्यायालयात आव्हान दिलेले नाही. साक्षदार स्वत: सांगतो की माझे वडील बिमार होते. हे म्हणने खरे आहे की माझे वडील दिनांक २१.१०.१९९८ पासून कामावर गेले नाही. हे म्हणने खरे आहे की माझे वडीलानी दिनांक २१.१०.१९९८ नंतर गरअर्जदार याना अनउपस्थिती बाबत अर्ज केले नाही. हे म्हणने खरे नाही की त्यावेळेस माझी आई सुध्दा नगर परिषद मध्ये काम करीत होती.

प्र.— तुमचे वडील दिनांक २१.१०.१९९८ पासून गैरहजर असल्याबाबत गैरअर्जदार याना गैरहजेरीबाबत अर्ज तुमच्या व्दारे किंवा पोष्टाव्दारे पाठवू शकत होते ?

उ — अर्ज पाठवू शकत होते परंतू ते त्या हालतमध्ये नव्हते.

हे म्हणने खरे आहे की गैरअर्जदार यानी माझे वडीलाना दिनांक ३१.०७.१९९९ रोजी पत्र पाठवीले होते की तुमची मानसीक स्थिती खराब असल्याबाबतचे वैधकीय कगदपत्रे नगर परिषद याना सादर करावे. हे म्हणने खरे आहे की त्यानुसार माझे वडीलानी कागदपत्रे नगर परिषदेला सादर केले नव्हते. साक्षदार स्वत: सांगतो की माझे वडीलांची त्यावेळेस मानसीक स्थिती चांगली नव्हती. हे म्हणने खरे आहे की मी सदर प्रकरणामध्ये माझे वडीलांची मानसिक स्थिती चांगली नव्हती याबाबतचे वैधकीय कागदपत्रे प्रकारणामध्ये दाखल केले नाही. हे म्हणने खरे नाही की माझे वडीलांची दिनांक २१.१०.१९९८ पासून तबीयत खराब होती हे मी खोटे सांगत आहे. हे मला माहीत नाही की गैरअर्जदार यानी माझे वडीलाना कामावर येण्याकरीता नोटीस पाठवील्या होत्या किंवा नाही. हे म्हणने खरे नाही की माझे वडीलांची तबीयत खराब होती म्हणून ते कामावर जात नव्हते हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणने खरे आहे की माझे वडीलांना दिनांक २१.१०.१९९८ पासून सेवा निवृत्त केले. हे म्हणने खरे नाही की महानगर पालिकेंने माझे वडीलाना सेवानिवृत्त करण्याचा जो निर्णय घेतला तो योग्य घेतला. हे म्हणने खरे नाही की माझे वडीलानी गैरअर्जदार यांचेकडे १७ वर्षे १० महीने एवढी सेवा केली होती. हे म्हणने खरे नाही की माझे वडीलाची सेवा २० वर्षे पूर्ण झाली नव्हती. साक्षदार स्वत: सांगतो की ज्यावळेस माझे वडीलानी ऐच्छिक सेवानिवृत्तीचा अर्ज दिला होता तेंव्हा त्याची २० वर्षे सेवा पूर्ण झाली होती. हे म्हणने खरे आहे की माझे वडीलांची २० वर्षे सेवा पूर्ण झाली नव्हती म्हणून ते पेन्शन मीळण्यास पात्र नव्हते. हे म्हणने खरे नाही की माझे वडीलांची २० वर्षे सेवा पूर्ण झाली नव्हती म्हणून

आमच्या कुटुंबातील सदस्य नोकरी मीळण्यास पात्र नव्हते. हे म्हणने खरे नाही की माझे वडील सन २०११ ते २०१६ पर्यन्त रुपये १२०००/– प्रती महा प्रमाणे एकुण ५,७६,०००/– पेन्शन रक्कम मीळण्यास पात्र नव्हते. हे म्हणने खरे नाही की माझे वडील व माझी आई सन २०१६ ते २०१९ पर्यन्त रुपये १२०००/– प्रति महा प्रमाणे एकुण रुपये २,८८,०००/– पेन्शन रक्कम मीळण्यास पात्र नव्हते. हे म्हणने खरे नाही की माझे वडील व माझी आई सन २०१९ ते २०२३ पर्यन्त रुपये १६०००/– प्रति महा प्रमाणे एकुण रुपये १,९२,०००/– पेन्शन रक्कम मीळण्यास पात्र नव्हते. हे म्हणने खरे नाही की माझे वडीलाना सेवा निवृत्तीची रक्कम रुपये ७,००,०००/– एवढी मीळायला पाहीजे होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे आहे की सदर प्रकरणामध्ये आम्ही माझे वडील सेवा निवृत्तीची रक्कम रु ७,००,०००/– मीळण्यास पात्र होते ती रक्कम कशी काढली हे नमूद केलेले नाही. हे म्हणने खरे नाही की मी व माझे आईनी खोटे प्रकरण गैरअर्जदारा विरुध्द दाखल केले आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण झाला.

फेर तपास नाही.

माझे समक्ष

स्वा/–

(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश

कामगार न्यायालय, चंद्रपुर.

दि. २४.०९.२०२४.